रेवस, ता.अलिबाग, जि.रायगड येथे रो रो जेट्टीचे बांधकाम करणे रु. ३७.०४ कोटी या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांकः ०५२४/प्र.क्र.३९/बंदरे-२**

गृह विभाग, मंत्रालय मुंबई ४०० ०३२

दिनांक :- १२ जून, २०२६

**वाचा :-** १.जा.क्र.मसामं/मुकाअ/अभि-३/रेवस सु.प्र.मा./२०२३-२४/२१८८ दि.२९.०४.२०२४ रोजीचे पत्र.

२. महाराष्ट्र सागरी मंडळ यांचे दि.११.०२.२०२६ रोजीचे पत्र.

३. वित्त विभागाच्या पत्र क्र.व्ययअ-२०२६/प्र.क्र.१२/अर्थ-२, दि.१५.०५.२०२६ चे इतिवृत्त

**प्रस्तावना:-**

रेवस, ता.अलिबाग, जि.रायगड येथे रो रो जेट्टीचे बांधकाम करणे या कामाच्या रु. ३७,०४,०२,५४९/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

रेवस ता.अलिबाग, जि.रायगड येथे रो रो जेट्टीचे बांधकाम करण्याबाबत शासन निर्णय दि.२३.०१.२०१९ अन्वये रु.२५,०७,१०,८९९/- इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास सागरमाला योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

रेवस, ता.अलिबाग, जि.रायगड येथे रो रो जेट्टीचे बांधकाम करणे या कामाच्या उर्वरीत करावयाच्या कामाची रक्कम रु.२३,३६,५१,२१४/- इतकी होती. तद्नंतर सदर किंमतीपेक्षा सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीमध्ये रु.१३,६७,५१,३३५/- इतकी वाढ झालेली आहे.

**शासन निर्णय :**

रेवस, ता.अलिबाग, जि.रायगड येथे रो रो जेट्टीचे बांधकाम करणे या कामाच्या रु. ३७,०४,०२,५४९/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रशासकीय मान्यता व सुधारीत प्रशासकीय मान्यतेनुसार या अंदाजपत्रकाचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचा वाव | मुळ प्र.मा.रक्कम रुपये (रु. लाखात) | प्रस्तावित सुधारीत प्र.मा.नुसार रक्कम (रु. लाखात) |
|---|---|---|---|
| | भाग-अ | | |
| १ | जेट्टी बांधकाम करणे | २०,५५,९१,८०५.०० | ३०,५१,८०,१४८.०० |
| २ | स्वामित्वधन (रॉयल्टी) | ३,७८,९५०.०० | १५,९०,८९२.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | क्वालिटी कंट्रोल व टेस्ट | | |
| | कामगार विमा (०.५% /१%) | १०,७१,०४७.९३ | १६,८४,२८८.१० |
| | सेवा कर (GST)(१२%/१८%) | २,६८,६१,८८१.९८ | ३,०३,१७,१८६.४१ |
| | Consultancy ४% | ८२,३८,८३०.२० | ८२,३८,८३०.२० |
| | Consultancy ४% | ८५,६८,३८३.४१ | ६७,३७,१५२.५० |
| | Escallation | - | १,६८,४२,८८१.३४ |
| | **एकूण किंमत** | २५,०७,१०,८९९.०० | ३७,०४,०२,५४९.०० |

३.	सदर कामावरील खर्च हा लेखाशिर्ष **"मागणी क्र.बी-७, ३०५१ बंदरे व दिपगृहे, (००)(०३) जेट्टीच्या बांधकामाकरीता केंद्राचे सहाय्य (सागरमाला) (कार्यक्रम) ३५, भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान (३०५१ १८९१)"** या तरतुदीतून भागविण्यात यावा.

४.	सदर शासन निर्णय व्यय अग्रक्रम समितीच्या दि.३०.०४.२०२६ रोजीच्या बैठकीबाबत वित्त विभागाच्या पत्र क्र.व्ययअ-२०२६/प्र.क्र.१२/अर्थ-२, दि.१५.०५.२०२६ अन्वये निर्गमित केलेल्या इतिवृत्तानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५.	**व्यय अग्रक्रम समितीने या सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास खालील अटिच्या अधिन राहून मान्यता प्रदान केलेली आहे-**

१) सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेतच काम पूर्ण करण्याची दक्षता विभागाने घ्यावी. तसेच विहित मुदतीत काम पुर्ण करण्यासाठी पुरेसा निधी अर्थसंकल्पीत करण्याची जबाबदारी विभागाची राहील.

२) योजनेची अंमलबजावणी करताना प्रचलित शासन निर्णय, नियम, CVC तत्वे, वित्तीय मर्यादा, विहीत निविदा कार्यपध्दती अनुसरणे, आवश्यकतेनुसार राज्य तांत्रिक सल्लागार समितीने प्रकल्पाच्या व कामाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशाचे व त्रुटींची पूर्तता करणे याची सर्वस्वी जबाबदारी विभागाची राहील.

३) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील तांत्रिक बाबी, निविदाविषयक क्षेत्रिय निर्णय किंवा अनियमितता यास मान्यता गृहित धरली जाणार नाही. अशा प्रकरणाची तपासणी त्यावेळच्या प्रचलित शासन नियमानुसार करण्याची जबाबदारी विभागाची राहील.

६.	मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. १८.०१.२०२२ रोजी संपन्न झालेल्या शक्ती प्रदान समितीच्या बैठकीनुसार, सागरमाला कार्यक्रमांतर्गत घ्यावयाच्या मुळ अंदाजपत्रकिय किंमतीमध्ये प्रशासकिय व तांत्रिक कारणास्तव मंजूरीस विलंब झाल्यामुळे प्रकल्पांच्या किंमतीमध्ये दर/भाव वाढीमुळे होणारी अधिकची रक्कम राज्य शासनाने उपलब्ध करुन द्यायची आहे. सदरचा निर्णय हा सन २०२२-२३ आणि २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी लागु होतो.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६१२११४००६४८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SHUBHANGI ASHAY POTE
Date: 2026.06.12 11:40:58 +05'30'

**( शुभांगी पोटे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (बंदरे) यांचे खाजगी सचिव,
२. मा. राज्यमंत्री (बंदरे) यांचे खाजगी सचिव,
३. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई.
४. प्रधान सचिव (बंदरे), मंत्रालय, मुंबई,
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग (व्यय-८/अर्थसंकल्प-११), मंत्रालय, मुंबई-३२.
९. नियोजन विभाग (का. १४६१), मंत्रालय, मुंबई-३२.
१०.निवडनस्ती (बंदरे-२)